# प्रास्ताविक

प्रत्येक लोकशाही राष्ट्रात विधिमंडळ महत्वाची कामगिरी बजावीत असते. आपण स्विकारलेल्या संसदीय लोकशाही शासन पध्दतीमध्ये भारतीय संविधानातील तरतुदींनुसार विधिमंडळाचे काम म्हणजे सरकार बनविणे, सरकारला योग्य प्रकारे वागायला लावणे व प्रसंगी सरकार बदलणे (To Create Government, to Criticize Government, to Censure Government and if need be to end Government), सरकारी कामकाजावर देखरेख ठेवणे, सरकारी कारभारात गैरप्रकार आढळल्यास त्याबद्दल जाब विचारणे इत्यादी विधिमंडळाची कामे आहेत. या कामांची विभागणी तीन प्रकारात करता येईल. ती कामे म्हणजे वैधानिक, आर्थिक व टीकात्मक होत. विधिमंडळाचे प्रमुख कार्य म्हणजे विधिनियम किंवा कायदे करणे हे आहे. परंतु, त्याचबरोबर आपण कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारलेली असल्याने राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी सर्वांगीण नियोजनाचा म्हणजे राज्याच्या सर्वांगीण अर्थव्यवहाराबद्दलचा राज्य विधिमंडळाला विचार करावा लागतो. राज्यात नवे कर बसविणे, करात वाढ करणे अगर करपध्दति बदलणे, अंदाजपत्रक मंजूर करणे, कार्यकारी मंडळ विधिमंडळाने संमत केल्याप्रमाणे योग्य त-हेने खर्च करते किंवा कसे हे पाहण्याचे काम विधिमंडळ करते. विधिमंडळाचे तिसरे आणि महत्वाचे कार्य टीकात्मक स्वरुपाचे आहे. शासन यंत्रणेवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी सदस्य विविध संसदीय आयुधांच्या सहाय्याने जसे प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, स्थगन प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव तसेच अन्य विविध प्रकारचे प्रस्ताव, ठराव, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा, अल्पकालीन चर्चा इ. व्दारे आपली संसदीय व मतदारांप्रती असणारी जबाबदारी पार पाडीत असतात.

महाराष्ट्र राज्य विधानमंडळात राज्यपाल व दोन्ही सभागृहे म्हणजे महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषद यांचा समावेश आहे व त्यांचा संयुक्तपणे 'विधिमंडळ ' असा उल्लेख केला जातो. सर्वसाधारणपणे दरवर्षी विधानमंडळाची तीन अधिवेशने होतात. त्यापैकी पहिली दोन म्हणजे अर्थसंकल्पीय अधिवेशन व पावसाळी अधिवेशन ही मुंबईत होतात तर हिवाळी अधिवेशन नागपूर येथे होते.

विधिमंडळाचे प्रशासकीय कामकाज पाहण्याची व्यवस्था म्हणून भारतीय संविधानातील अनुच्छेद १८७ मधील तरतुदीनुसार 'विधिमंडळ सचिवालय' या स्वतंत्र यंत्रणेची व्यवस्था आहे. या सचिवालयावर विधिमंडळाचे म्हणजे पर्यायाने राज्यपाल व दोन्ही सभागृहांचे पीठासीन अधिकारी यांचे अधिपत्य असते. त्यांच्या संपूर्ण नियंत्रणाखाली या सचिवालयाचे कामकाज चालते.